# महाराष्ट्रीय मंडळाचे चंद्रशेखर आगाशे  शारीरिक शिक्षण महाविद्यालय

## वार्षिक अहवाल 2015-16

महाराष्ट्रीय मंडळाचे आद्य संस्थापक कै. कॅ. शिवरामपंत दामले व त्यानंतर मंडळाचे अध्वर्यू माजी सरकार्यवाह कै. रमेश दामले यांच्या पवित्र स्मृतिस अभिवादन करून महाविद्यालयाचा शै. वर्ष 2015-16 चा वार्षिक अहवाल सहर्ष सादर करीत आहे. या महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे बी.पी.एड्., एम.पी.एड्., एम.फिल.(शारीरिक शिक्षण)(सुटीतील) व पीएच.डी.(शारीरिक शिक्षण) पर्यंतचे अभ्यासक्रम राबविले जातात महाविद्यालय एन.सी.टी.ई. मान्यताप्राप्त असून नॅक पुनर्मूल्यांकित आहे.

## ठळक वैशिष्ट्ये

1) शै. वर्ष २०१५–१६ पासून बी.एड (शा.शि.) अभ्यासक्रमाचे नाव बी.पी.एड व कालावधी  दोन वर्षे
2) २९ व्या पुणे इंटरनॅशनल मॅरेथॉन सिंपोझियमचे आयोजन (५ डिसेंबर २०१५)
3) सालाबादप्रमाणे बी.एड्.(शा.शि.) व एम.एड्.(शा.शि.)  निकालामध्ये  नेत्रदीपक यश
4) क्रीडापटूंचे राष्ट्रीय स्तरावर योगदान  सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघांमध्ये प्रतिनिधीत्त्व
5) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तरावर क्रीडासहभाग
6) शै.वर्ष १९९७–९८ व शै. वर्ष २००२–०३ च्या बी.एड.(शा.शि.) च्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा
7) महाविद्यालयामध्ये Sports Carnival दिमाखात संपन्न (२८,२९ जाने.२०१६)
8) पुण्यातील १०० शाळांतील विद्यार्थ्यांसाठी Obsty Race चे महाविद्यालयामध्ये आयोजन (१,२,३ फेब्रु.२०१६)
9) एकूण 04 विद्यार्थ्यांना पीएच.डी. (१५–४–२०१५ पर्यंत)
10) राज्य व राष्ट्रीय पातळीवर विद्यार्थ्यांना कॅंपस रिक्रूटमेंट
11) पतियाळा येथील आंतरराष्ट्रीय क्रीडा परिषदेत एमपीएड (द्वितीय वर्ष) विद्यार्थ्यांचा व प्राध्यापकांचा सहभाग व शोधनिबंधांचे सादरीकरण
12) प्राईड ऑफ आगाशे पारितोषिक –  उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक संघटक (पूर्वीचेदादोजी कोंडदेव पारितोषिक विजेते) श्री राजाराम  राऊत यांना जाहीर

13) यूजीसी (एमआरपी), स्पोर्टस व कॉलेज डेव्हलपमेंट प्लॅन डॉक्युमेंटस सबमिशन

14) परीक्षा आयोजन व केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प

15) तंत्रज्ञानाधिष्ठित अध्यापन, संशोधन व व्यवस्थापन

एन.सी.टी.ई.च्या रुल्स व रेग्युलेशन्स २०१४ अन्वये सा.फु. पुणे विद्यापीठाच्या बी.एड.(शारीरिक शिक्षण) व एम.एड.(शारीरिक शिक्षण) अभ्यासक्रमाचे नाव बी.पी.एड व एम.पी.एड असे करण्यात आले असून बी.पी.एड अभ्यासक्रमाचा कालावधी २ वर्षे करण्यात आला आहे.

**गतवर्षीय परीक्षा फल : सालाबादप्रमाणे निकालामध्ये नेत्रदीपक यश**

| अभ्यासक्रम | निकाल |
|---|---|
| बी.एड्. (शा.शि.) | 82%, |
| एम.एड्.(शा.शि) | 100% |
| | |

| अभ्यासक्रम | 2015-16 मधील उत्तीर्ण | 2015-16 पर्यंत उत्तीर्ण |
|---|---|---|
| एम.फिल (शा.शि.) | 03 | 86 |
| पीअेच.डी. | 04 | 29 |
| सेट परीक्षा (निकाल सप्टें२०१५) | 07 | |

- **महाविद्यालयात व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सर्वप्रथम**

बी.एड्.(शा.शि.) – श्रीमती नकिता फर्नांडिस

एम.एड्. (शा.शि.)– श्रीमती शिरोळे जलजा

दरवर्षी अनेक विद्यार्थी सेट / नेट परीक्षा उत्तीर्ण होतात. सप्टेंबर २०१५ मध्ये ०५ विद्यार्थी सेट परीक्षा उत्तीर्ण झाले.

- **एम.फिल (शा.शि.) पदवी प्राप्त (२०१५–१६)**

१) श्री अंबादास फटांगरे (O Grade)२) श्री हारदे संदीप (O Grade)३) कु. पाटील लीना (A Grade)

- **पीएच.डी पदवी प्राप्त (२०१५–१६)**

१) प्रा. राघव अष्टेकर २) प्रा. पंकज ढमाळ ३) प्रा. विलास जोंधळे ४) प्रा. पंकज ढमाळ

**प्रवेश**

- **बी.पी.एड्.** एन.सी.टी.ई.च्या आदेश २०१४ नुसार बी.पी.एड्. अभ्यासक्रम शै. वर्ष २०१५–१६ पासून दोन वर्षांचा करण्यात आला व विद्यार्थीसंख्येची मर्यादा १०० इतकी आहे. या वर्षावधीत १०० विद्यार्थ्यांनी बी.पी.एड्. अभ्यासक्रम (प्रथमवर्ष) साठी प्रवेश घेतला आहे.
- **एम.पी एड.**एम.पी.एड (प्रथमसत्र) अभ्यासक्रमास ४० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. एम.एड.(द्वितीयवर्ष) मध्ये ३७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यामध्ये **सराव अध्यापनास** शास्त्रीय व शैक्षणिक बैठक देण्याचे प्रयत्न करण्यांत आले. द्वितीयसत्रापासून वेळोवेळी कार्यशाळा व संशोधन कार्यासाठी कार्यक्रम घेतल्यामुळे विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण संशोधनाचे आकलन व प्रत्यक्ष संशोधन सुकर झाले. या विद्यार्थ्यांना ख़ालील तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले.

  श्री गणेश गावडे – व्हॉलीबॉल श्रीमती पल्लवी कव्हाणे –योगा

  श्री प्रतिक जाधव व श्री संतोष पवार – बास्केट्बॉल

  अनिरुध्द शर्मा – सॉफ्टबॉल

- **एम. फिल्.(शा.शि.)**

  शै. वर्ष 2015-17 साठी ०५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. या वर्षावधीत ४ विद्यार्थ्यांनी एम. फिल्.(शा.शि.) पदवी प्राप्त केली.

- **पीअेच.डी.**

  मे २०१५ मध्ये १४ विद्यार्थ्यांची पीएच.डी साठी निवड झाली. या वर्षावधीमध्ये 04 विद्यार्थ्यांना पीएच.डी जाहीर झाली.

- **विद्यार्थ्यांचा ओघ**

  दरवर्षी महाविद्यालयात विविध राज्यातील तसेच परदेशातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांना विद्यार्थी प्रवेश घेतात व यशस्वी होतात. उत्तराखंड व गोवा या राज्यातील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेउन(बी.पी.एड – ०८ व एम.पी.एड ०५) महाविद्यालयास पसंती दर्शविली आहे. बी.पी.एड अभ्यासक्रमाच्या दोन तुकड्या अनुदानित आहेत.  एम. फिल (शा.शि) अभ्यासक्रम(२०१५–१७) साठी ०३ प. बंगालच्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे

## क्रीडास्पर्धा प्राविण्य

1) आंतरविद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांचा सहभाग
2) सलग २० व्या वर्षी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये पदके प्राप्त.विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके
3) Endro$_3$ Adventure Race मध्ये विद्यार्थ्यांचे यश, रू.25,000/- ची रोख पारितोषिके पटकावली
4) क्रीडाप्राविण्याबद्दल विद्यार्थ्यांना पुढील प्रमाणे गौरविण्यात आले.

| अ.क्र. | नाव | पुरस्कार रोख रु. |
|---|---|---|
| 1 | श्री पवार अनिकेत एमपीएड | रू.3,000/- |
| 2 | कु. गायकवाड स्वाती एम.पी. एड्. | रू.1,000/- |
| 3 | कु. गायकवाड दीपाली बी.पी. एड्. | रू.1,000/- |
| 4 | कु. तावरे गौरी बी.पी.एड्. | रू.1,000/- |

**क्रीडासहभाग**

महाविद्यालयामध्ये दरवर्षीच विविध क्रीडाबाबींमध्ये आंतरमहाविद्यालयीन, विभागीय व राष्ट्रीय पातळीवर खेळलेले खेळाडूंचा सहभाग असतो. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धासामन्यांमध्ये एकूण १३ सांघिक क्रीडाबाबी व ३ वैयक्तिक क्रीडास्पर्धामध्ये आमच्या खेळाडूंचा सहभाग होता.

**आंतरमहाविद्यालयीन आंतरविभागीय व राष्ट्रीय पातळी वरील सहभाग**

| **स्तर** | **मुले** | | **मुली** | | **एकूण** | | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **बीपीएड्.** | **एमपीएड्** | **बीपीएड्.** | **एमपीएड्** | **बीपीएड्.** | **एमपीएड्** | |
| आंतरमहाविद्यालयीन | 64 | 69 | 37 | 24 | 101 | 93 | **194** |
| विभागीय पातळी | 12 | 15 | 7 | 7 | 19 | 22 | **41** |
| आंतरविद्यापीठ व अखिल भारतीय आंतरविद्यापीठ | 04 | 01 | 03 | 02 | 07 | 03 | **10** |

**आंतर महाविद्यालयीन वैयक्तिक सहभाग – ४ क्रीडाबाबी**

| **अ.क्र.** | **क्रीडाप्रकार** | **मुले** | **मुली** |
|---|---|---|---|
| १ | चेस | सहभाग | - |
| २ | स्विमिंग | सहभाग | - |
| ३ | सायकलिंग | सहभाग | सहभाग |
| ४ | बॉक्सिंग | | 2 IInd<br>1 Ist |

**महाविद्यालयाचे सांघिक बाबीं मधील यश– १३ क्रीडाबाबी**

प्रथम क्रमांक – ०२, द्वितीय क्रमांक – ०२ , तृतीय क्रमांक – ०३

| अ.क्र. | क्रीडाबाबीचे नांव | आंतरमहाविद्यालयीन स्तर | |
|---|---|---|---|
| | | मुले | मुली |
| 1 | ॲथलेटिक्स | सहभाग | सहभाग |
| 2 | बेसबॉल | द्वितीय क्रमांक | – |
| 3 | बास्केटबॉल | तृतीय क्रमांक | – |
| 4 | क्रॉस कंट्री | – | प्रथम क्रमांक |
| 5 | फुटबॉल | चतुर्थ क्रमांक | – |
| 6 | हॅन्डबॉल | द्वितीय क्रमांक | – |
| 7 | कबड्डी | सहभाग | सहभाग |
| 8 | खो खो | प्रथम क्रमांक | सहभाग |
| 9 | बॉक्सिंग | सहभाग | सहभाग |
| 10 | सॉफ्टबॉल | तृतीय क्रमांक– | - |
| 11 | व्हॉलीबॉल | सहभाग | तृतीय क्रमांक |
| 12 | टेबलटेनिस | सहभाग | - |
| 13 | चेस | सहभाग | – |

**खुल्या क्रीडा स्पर्धा सामन्यांमध्ये आमच्या खेळाडूंचा वैयक्तिक सहभाग पुढीलप्रमाणे**

| अ.क्र | नांव | क्रीडाबाब | निकाल |
|---|---|---|---|
| 1 | प्रियंका मोपरे | बॉक्सिंग | द्वितीय |
| 2 | स्वाती गायकवाड | बॉक्सिंग | द्वितीय |
| | | थायकिक बॉक्सिंग राज्यस्तरीय स्पर्धा | प्रथम क्र. |
| 3 | रेखा यलगुंदे | बॉक्सिंग | प्रथम क्र. |
| | | कराटे जिल्हा व राज्यस्तरीय फुलकॉटॅक्ट स्पर्धा | प्रथम क्र. |
| 4 | ओंकार थोरात | क्रिकेट जिल्हा आमंत्रित स्पर्धा | प्रथम क्र. रु.२१,०००/– |
| 5 | अनिल परमार | क्रिकेट जिल्हा आमंत्रित स्पर्धा | प्रथम क्र. |

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | आदित्य घुले | बेस्ट फिजिक<br>इंडियन बॉडी बिल्डिंग<br>फेडरेशन आयोजित | प्रथम क्र.(नॅशनल) |
| 7 | हांडे जनक | 21st Asian & International World Shatcon Karate | Gold Medal |
| 8 | तेजश्री वाव्हळ | Shooting Ball<br>राज्यस्तरीय स्पर्धा | प्रथम क्र.<br>रु.२५,०००/- |
| 9 | धनंजय बर्वे | Table Tennis<br>राज्यस्तरीय स्पर्धा | तृतीय क्र. |
| 10 | जयेश निखाडे | सॉफ्टबॉल<br>राज्यस्तरीय स्पर्धा<br>यवतमाळ | सहभाग |
| 11 | साहिल बागवान | सॉफ्टबॉल<br>बेसबॉल<br>राज्यस्तरीय स्पर्धा<br>यवतमाळ | चतुर्थ क्र.<br>सहभाग |
| 12 | स्वप्निल इंगवले | व्हॉलीसॉफ्टबॉल<br>राज्यस्तरीय स्पर्धा सासवड | सहभाग |
| 13 | रोविता फर्नांडिस | फुटबॉल<br>तेजबहादुर टुर्नामेंट | प्रथम क्र. |
| 14 | पवित्रा पवार | थायकिक<br>बॉक्सिंग<br>राज्यस्तरीय स्पर्धा दिल्ली | तृतीय क्र. |
| 15 | प्रियंका पाटील | थायकिक<br>बॉक्सिंग<br>राज्यस्तरीय स्पर्धा दिल्ली | प्रथम क्र. |
| 16 | सलमान चौधरी | किकबॉक्सिंग<br>National Competition 2015-16 | गोल्डमेडल |
| | | कराटे<br>राज्यस्तरीय स्पर्धा | गोल्डमेडल |
| 17 | कदम स्वाती | व्हॉलीबॉल<br>राज्यस्तरीय स्पर्धा सासवड | द्वितीय |

- **खुल्या स्पर्धांमधील विशेष यश : एनड्युरो नाईट एडव्हेचर रेस**

  स्पर्धेचे अंतर –160 कि.मी., 90 कि.मी. ट्रेकिंग , 100 मी. स्विमिंग, रायफल शूटिंग 40 मी

  **स्पर्धेतील विजेते खेळाडू**

  प्रथम क्रमांक (रोख पारितोषिक रू. 15,000/- व स्मृतिचिन्ह)

  - ➢ कैलास कासार एम. एड्.(शा.शि.) (द्वितीयवर्ष)
  - ➢ ज्योती जाधव एम. एड्.(शा.शि.) (द्वितीयवर्ष)

  प्रथम क्रमांक (रोख पारितोषिक रू. 10,000/- व स्मृतिचिन्ह)

  - ➢ विकास आतिग्रे – एम. एड्.(शा.शि.) (द्वितीयवर्ष)
  - ➢ प्रियंका औटी एम. एड्.(शा.शि.) (द्वितीयवर्ष)
  - ➢ विजय भस्मे एम. एड्.(शा.शि.) (द्वितीयवर्ष)

- **पंच कार्य –** ०८ विद्यार्थ्यांनी रोल बॉल स्पर्धांमध्ये पंच म्हणून कार्य केले.

आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांखेरीज आमचे खेळाडू विद्यार्थी अनेक राष्ट्रीय/ राज्यस्तरीय /जिल्हास्तरीय खुल्या क्रीडास्पर्धांमध्ये सहभागी होऊन पंचकार्य करतात. रोख पारितोषिके मिळवितात व स्वकष्टार्जित कमाई करून शिक्षणाचे शुल्क भरतात.

- **विशेष कामगिरी**

महाराष्ट्रामध्ये पडलेल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर Donate the water या संकल्पनेवर जितो या पुण्यातील संघटनेने आयोजित केलेल्या मिनि मॅरेथॉन रॅली मध्ये महाविद्यालयाचे ३६ मुले मुली सहभागी झाले. या स्पर्धेत भाग घेतलेल्या विद्यार्थ्याने पळालेल्या प्रत्येक कि.मी ला १० लि. याप्रमाणे विदर्भ व मराठवाड्याला पाणीपुरवठा करण्यात आला.

## आयोजन

- **आंतरमहविद्यालयीन स्पर्धा आयोजन**

  महाविद्यालय, स्पर्धा सहभागाबरोबरच विविध पातळींवरील स्पर्धांचे आयोजन करते. ह्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष स्पर्धा आयोजनाचाही अनुभव मिळतो.यंदा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन बास्केटबॉल (पुरुष), फुटबॉल (पुरूष) व आंतर. विभागीय फुटबॉल (महिला) या स्पर्धांचे आयोजन महाविद्यालयाने केले.

- **Sports and Fitness Carnival**

सालाबादप्रमाणे चंद्रशेखर आगाशे कॉलेज व भारती विद्यापीठ व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ शारीरिक शिक्षण पदव्युत्तर विभाग यांच्या संघांमध्ये. 28 व 29 जानेवारी 2016 रोजी विशेष स्पर्धांचे आयोजन करण्यांत आले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शारीरिक शिक्षण विभाग, भारती विद्यापीठातील एमपीएडचे विद्यार्थी आणि आगाशे महाविद्यालयातील एमपीएडचे विद्यार्थी,यांमध्ये प्रश्नमंजूषा सदर, फुटबॉल, रस्सीखेच,अडथळा शर्यत, हॅन्डबॉल, क्रिकेट या स्पर्धा आयोजित करण्यांत आल्या. यामध्ये सर्वसाधारण विजेतेपद महाविद्यालयाने पटकाविले . शै. वर्ष २०११–१३ च्या विद्यार्थ्यातर्फे दरवर्षी ह्या कार्निव्हलमधील प्रत्येक बाबीसाठी क्रीडाचषक पुरस्कृत करण्यात येतात.त्याचप्रमाणे कै. शैलेश जगताप यांचे स्मरणार्थ उदयोन्मुख खेळाडूस शिष्यवृत्ती प्रदान केली जाते. सांस्कृतिक कार्यक्रमही विद्यार्थ्यांद्वारे सादर करण्यात आले. स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ **श्री पराग ओझा** व संस्थेचे सरकार्यवाह **मा. श्री धनंजय दामले** यांचे हस्ते संपन्न झाला. **डॉ. आहेर व डॉ. बोडके** यांनी या स्पर्धांचे संयोजन केले.

- **प्रजासत्ताक दिनाचे,** संस्थेच्या ०६ शाळा व वाणिज्य महाविद्यालयासह एकत्रितपणे भव्य स्वरूपात आयोजन करण्यांत आले.

- **आंतरकुल स्पर्धा –**

हा बीपीएड् अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणा–या भावी शिक्षकांसाठी अतिशय उपयुक्त कार्यक्रम. यामध्ये विद्यार्थ्यांना स्पर्धांचे आयोजन व व्यवस्थापन प्रशिक्षण देण्यांत येते. दर शनिवारी आयोजित होणा–या आंतरकुल स्पर्धांमध्ये यंदा एकूण ११ क्रीडाबाबींच्या स्पर्धा आयोजित करण्यांत आल्या. या वर्षावधीतील विविध स्पर्धांमध्ये हे शिवाजी कुल व विद्यार्थिनींमध्ये वंदना ही कुले अव्वल स्थानी आहेत.

- **ॲथलेटिक मीट –**

सालाबादप्रमाणे यंददेखील ॲथलेटिक मीट (मैदानी क्रीडामहोत्सव) थाटात संपन्न झाला. या स्पर्धेत महाविद्यालयातील प्राध्यापक व सर्व विद्यार्थी सहभागी झाले. यामध्ये एकंदर २६ क्रीडाबाबींचा समावेश होता. पुरूष विभागात बीपीएडचे विद्यार्थी श्री शेख मझर वेगवान धावपटू ठरले तर महिला विभागात कु. दीपाली गायकवाड वेगवान धावपटू ठरली. भालाफेकीमध्ये बीपीएडचे विद्यार्थी श्री विक्रम कांदळकर यांनी ५७.६० मी. भालाफेक करून पूर्वीचे श्री मुकेश रावत यांचा ४९.५६ मी.चा उच्चांक मोडला. ॲथलेटिक मीटमध्ये सर्वाधिक गुण मिळवून विद्यार्थ्यांमध्ये शिवाजी कुल विजेते ठरले, तर विद्यार्थिनींमध्ये

मैदानीस्पर्धांमध्ये प्रेरणाकुल विजेते ठरले.बीपीएड व एमपीएडच्या विद्यार्थ्यांनी सर्व प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली व सेवकांच्या सहकार्याने मैदानी स्पर्धा यशस्वीपणे पार पाडल्या.

- **माजी विद्यार्थी मेळावा**

शै. वर्ष १९९६–९७ व २००२–०३ च्या बी.एड (शा.शि.) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा अनुक्रमे दि.२४ ऑक्टोबर २०१५ व ११ नोव्हेंबर २०१५ रोजी संपन्न झाला. यावेळी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीविषयी समाधान व्यक्त केले.

- **बी.पी.एड्.(दोन वर्षीय) सुधारीत अभ्यासक्रम विषयक विद्यापीठस्तरीय कार्यशाळा**

सा.फु.पुणे विद्यापीठाच्या बी.पी.एड्. (शारीरिक शिक्षण) अभ्यासक्रम जून २०१५ पासून दोन वर्षाचा करण्यात आला आहे. या महाविद्यालयामध्ये सा.फु.पुणे विद्यापीठाशी संलग्नित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांसाठी बी.पी.एड्. सुधारित अभ्यासक्रम राबविण्याच्या दृष्टीने चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, पुणे ३७ येथे मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित करण्यांत आली. शुक्र. दि. ११ सप्टेंबर २०१५ झालेल्या या कार्यशाळेमध्ये तज्ञ प्राध्यापकांनी उदबोधन केले. या मार्गदर्शनाचा फायदा नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करताना निश्चित होईल.कार्यशाळेसाठी सा.फु. पुणे विद्यापीठ संलग्नित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील प्राचार्य व प्राध्यापक,असे २० शिक्षक उपस्थित होते.डॉ. महेश देशपांडे या कार्यशाळेचे समन्वयक होते.

- **इंटरनॅशनल मॅरेथॉन कॉन्फरन्स**

पुणे इंटरनॅशनल मॅरेथॉन ट्रस्ट व आगाशे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने इंटरनॅशनल मॅरेथॉन कॉन्फरन्सचे दि. ५ डिसेंबर २०१६ रोजी यशस्वी आयोजन करण्यात आले. संस्थेचे सरचिटणीस मा.श्री धनंजय दामले या कॉन्फरन्सचे अध्यक्ष होते. यामध्ये मॅरेथॉनचा इतिहास, मॅरेथॉन खेळाडूंचे प्रशिक्षण, आहार व दुखापती या विषयांवर विविध तज्ज्ञांची व्याख्याने झाली. त्यामध्ये अनेक राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय विदेशी खेळाडू, पंच व मॅरेथॉन संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शारीरिक शिक्षण संचालक, तज्ज्ञ मार्गदर्शक सहभागी झाले होते. डॉ.महेश देशपांडे या कॉन्फरन्सचे आयोजन समिती सचिव होते. या कॉन्फरन्सच्या आयोजनात महाविद्यालयाच्या प्राचार्या व सर्व प्राध्यापकवृंदाचा सहभाग होता.

- **अडथळा शर्यत (**Obstyrace)

महाराष्ट्रीय मंडळाचे प्रमुख ध्येय म्हणजे समाजात खेळाचा, शारीरिक सुदृढतेचा आणि शारीरिक शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करणे.त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रीय मंडळाच्या, चंद्रशेखर आगाशे

महाविद्यालयातर्फे Obstyrace या आगळ्यावेगळ्या नाविन्यपूर्ण व आव्हानात्मक स्पर्धेचे आयोजन १ ते ३ फेब्रुवारी २०१६ दरम्यान मंडळाच्या गुलटेकडी मैदानावर करण्यांत आले होते. या स्पर्धा आंतरशालेय स्तरावर घेण्यात आल्या. व वयोगट होता १६ वर्षाखालील मुले व मुली. स्पर्धा पुणे शहर व जिल्ह्यापुरती मर्यादित होती. या पहिल्यांदाच आयोजित केल्या गेलेल्या स्पर्धेत ५० मुलांच्या व २९ मुलींच्या शाळांचा सहभाग होता. २५ विद्यार्थ्यांचा एक संघ याप्रमाणे एकूण २२२५ मुले मुली स्पर्धांमध्ये सहभागी झाले होते.

स्पर्धेचे उदघाटन दि.१ फेब्रु. रोजी स.८.३० वाजता महाराष्ट्रीय मंडळाचे सरकार्यवाह श्री धनंजय दामले यांचे हस्ते झाले.प्राथमिक फेरीमध्ये एकूण १० अडथळे विद्यार्थ्यांनी पार करावयाचे होते. ज्यामध्ये, सरपट्णे, तोल सांभाळणे, ढांगा टाकणे, उंचावरुन उडी मारणे, टायरमधुन जाणे, जड बॅगा वाहून नेणे या अडथळ्यांचा समावेश होता. अंतिमफेरीसाठी १२ अडथळे ठेवण्यात आले होते. स्पर्धेदरम्यान मा. बाळासाहेब शिवरकर, श्री पराग ओझा व रुपाली मेहेंदळे यासारख्या अनेक मान्यवरांनी स्पर्धेस भेट दिली व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन प्रोत्साहित केले.

दि.३ फेब्रुवारी २०१६ रोजी या स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभामध्ये विजेत्या संघास रु.२५,०००/– उपविजेत्यास रु.२०,०००/– तर तृतीय संघास रु.१५,०००/– रु.ची पारितोषिके करंड्क व प्रत्येक खेळाडूस मेडल देऊन गौरविण्यांत आले. तर सर्वात वेगवान स्पर्धा पूर्ण करणा–या खेळाडूस रु.२०००/– द्वितीय विद्यार्थ्यास व तृतीय विद्यार्थ्यास रु.१०००/– चे रोख पारितोषिक देण्यात आले. या उपक्रमाचे शाळा, पालकवर्ग, शिक्षक व विद्यार्थी यांनी अतिशय कौतुक केले.

शिक्षण मंडळ पुणे, महानगरपालिकांच्या शाळांच्या शारीरिक शिक्षण शिक्षकांसाठी सप्टेंबर २०१६ मध्ये ३ दिवसांच्या **प्रबोधनवर्गाचे आयोजन** करण्यात आले. यामध्ये २०० क्रीडाशिक्षकांचा सहभाग होता या वर्गाचे संयोजन प्राध्यापकांच्या सहाय्याने डॉ राजे यांनी केले

- **शिबिर, सहली व परिषदांमध्ये सहभाग**

प्राध्यापकवृंदांच्या मार्गदर्शनाखाली स्नेहसेवा, खानापूर येथे विद्यार्थ्यांचे १० ते १३ डिसेंबर २०१५ या कालावधीत तीन दिवसीय निवासी शिबिर संपन्न झाले. यामध्ये नियोजित स्पर्धा कार्यक्रमांचा विद्यार्थ्यांनी अनुभव घेतला.विद्यार्थ्यांना सिंहगड येथे सहलीसाठी नेण्यात आले.

दि.१६ ते २२ फेब्रुवारी २०१६ या कालावधीत ग्लोबल कॉन्फरन्स ऑन फिजिकल एज्युकेशन ॲन्ड स्पोर्टस विषयवर पतियाळा पंजाब मध्ये डॉ. पोटे बी.एस.,डॉ. शरद आहेर, डॉ. श्रद्धा नाईक डॉ.महेश देशपांडे, डॉ.योगेश बोडके,डॉ.अमित प्रभू व प्रा शिरीष मोरे व  एम.एड.(शा.शि.) (द्वितीय वर्ष)अभ्यासक्रमाचे ३८ विद्यार्थी सहभागी झाले.प्राध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी या परिषदेमध्ये शोधनिबंध व पोस्टर प्रेझेंटेशन सादर केले.

- **प्राध्यापकांची विशेष कामगिरी**
  - प्राचार्या डॉ. वाघचौरे : २०१६–१७ साठी उच्चशिक्षण विभागाअंतर्गत बीपीएड व एमपीएड अभ्यासक्रमाच्या **केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समिती सदस्य.**
  - डॉ. कांगणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व भारती विद्यापीठाच्या आर. आर. कमिटीचे आणि गोवा विद्यापीठ – शारीरिक शिक्षण अभ्यासमंडळाचे सदस्य.२०१६–१७ साठी उच्चशिक्षण विभागाअंतर्गत बीपीएड व एमपीएड अभ्यासक्रमाच्या **केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समिती सदस्य.** २०१६–१७ साठी उच्चशिक्षण विभागाअंतर्गत बीपीएड व एमपीएड अभ्यासक्रमाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समितीचे सदस्य.
  - डॉ. अरुण शिंदे – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ शारीरिक शिक्षण अभ्यासमंडळाचे अध्यक्ष व आर आर कमिटीचे सदस्य आहेत
  - डॉ. आहेर व डॉ. बोडके – दि. १ ते ३ फ़ेब्रुवारी २०१६ या कालावधीत पुणे विभागातील सुमारे १०० शाळांतील २२२५ विद्यार्थ्यासाठी अडथळ्यांच्या शर्यतीचे यशस्वी आयोजन केले.
  - डॉ. उज्वला राजे :परमयोग योग संस्था, पुणे येथील टिचर्स ट्रेनिंग कोर्स योगा चा सर्टिफिकेट कोर्स पूर्ण केला.
  - डॉ. महेश देशपांडे – **एस.सी.इ.आर.टी. अभ्यासक्रम पुनर्रचना अभ्यासमंडळावर सदस्य.म**हाराष्ट्र राज्य शैक्षणिक पाठ्यपुस्तक मंडळ, बालभारती येथे इ. ५ ते ८ वीच्या अभ्यासक्रमांची मानके विकसित करण्यांत मुख्य सहभाग. त्याचप्रमाणे इ.५वी व ६वी  च्या आरोग्य व शारीरिक शिक्षण हस्तपुस्तिकांमधील प्रत्येकी ३ प्रकरणांचे लिखाण करण्यात सहभाग. श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पुणे येथे सेट परीक्षेच्या प्रथम पेपरवर व्याख्याने दिली.
  - बी.पी.एड्.अभ्यासक्रम पुनर्रचना समिती सदस्य – डॉ. अरुण शिंदे, (अध्यक्ष)  डॉ. श्रध्दा नाईक  डॉ. सोपान कांगणे, डॉ.बालाजी पोटे, डॉ. शरद आहेर, डॉ.महेश देशपांडे, डॉ. अमित प्रभू

- डॉ. उज्वला राजे यांनी योग मधील सर्टिफिकेट कोर्स पूर्ण केला.
- संस्थेतर्फे डॉ. अमित प्रभू यांना उत्कृष्ट शिक्षक म्हणून सन्मानित करण्यात आले. डॉ. प्रभू गिर्यारोहणासाठी हिमालयातील ६४५१ मी. उंच पापसुरा या शिखरावर जाऊन आले.
- प्राध्यापक ओरिएंटेशन प्रोग्राम व रिफ्रेशर कोर्स इ. मध्ये रिसोर्स पर्सन म्हणून सहभाग घेतात.

- प्रा. दादासहेब ढेंगळे यांनी डॉ. सोपान कांगणे यांच्या मार्गदर्शनाखाली सा.फु. पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी प्राप्त केली.
- आमचे प्राध्यापक नेहमीच नित्य कार्याव्यतिरिक्त संशोधन अभ्यास करुन क्रीडाक्षेत्रात भर घालत असतात. प्राचार्य व प्राध्यापक विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे परिषदा आदिमध्ये संशोधन निबंध, बीजभाषणे याद्वारा सहभाग घेतात. समाजात व्यायाम व तंदुरुस्ती विषयक व्याख़्याने देउन समाज प्रबोधन करतात.

आज मितीस महाविद्यालयात प्रभारी प्राचार्यांसह दहा प्राध्यापक पीएच.डी.प्राप्त आहेत.**महाविद्यालयात १२ पीअेच.डी. मार्गदर्शक म्हणून प्राध्यापकांना मान्यता प्राप्त आहे. या वर्षावधीत** प्रभारी प्राचार्या डॉ. माधुरी वाघचौरे यांच्या ०१ तर डॉ. अरुण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ०२ अशा ०३ विद्यार्थ्यींनी एम फिल पदवी प्राप्त केली. मार्गदर्शकांकडील खालील प्रमाणे विद्यार्थ्यांनी पीएच.डी पदवी संपादन केली.
डॉ. नयना निमकर ०१, डॉ. श. शं.देशपांडे ०१, डॉ. पी.के.पटेल ०१ व डॉ. पी.आर.बोरगावकर ०१.

डॉ. माधुरी वाघचौरे – या वर्षावधीत जून २०१५ मध्ये **बीजिंग क्रीडाविद्यापीठ चायना येथे पेपर सादरीकरण व पोस्टर प्रेझेंटेशन केले.** दि.३१ जाने. व १ फेब्रुवारी २०१६ या कालावधीत वैजनाथ कॉलेज – परळी वैजनाथ येथे आयोजित ३६ व्या महाराष्ट्र राज्य अशासकीय महाविद्यालयीन प्राचार्य महासंघाच्या राज्यस्तरीय अधिवेशनात डॉ. माधुरी वाघचौरे सहभागी झाल्या.
पतियाळा येथे ग्लोबल कॉन्फरन्स ऑन फिजिकल एज्युकेशन ॲन्ड स्पोर्टस मध्ये डॉ. बी.एस.पोटे, डॉ. शरद आहेर, डॉ. श्रद्धा नाईक डॉ.महेश देशपांडे, डॉ.योगेश बोडके,डॉ.अमित प्रभू व प्रा शिरीष मोरे यांनी शोधनिबंध सादर केले या क़ॉन्फरन्समध्ये डॉ. सोपान कांगणे व डॉ. उज्वला राजे यांनी देखील शोधनिबंध पाठविले होते. विलास एलके, अक्रम मुजावर –यंनी पोस्टर प्रेझेंटेशन सादर केले

- **शैक्षणिक प्रयोग**

विद्यार्थ्यांचे ज्ञान, कौशल्य आणि ॲटिट्यूड व ॲप्टिट्यूड हा पाया मानून शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यांत येते जेणेकरून बी.पी.एड्.अभ्यासक्रम पूर्ण करून बाहेर पडल्यानंतर विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होईल. अभिनव अध्यापन पध्दतींचा वापर करून विद्यार्थ्यांना तात्विक तसेच प्रात्यक्षिक कार्य आत्मसात करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येते. या वर्षी फिट्नेस फिस्ट कार्यक्रमा अंतर्गत सर्व प्राध्यापकवृंद व बीपीएड विद्यार्थी यांच्यामध्ये शारीरिक तंदुरुस्ती संदर्भात चर्चासत्र घेण्यात आले. (दि.६/०४/२०१६) यंदा एम.एड (शा.शि.) अभ्यासक्रमात मानव अधिकार व कर्तव्ये या विषयाचा अंतर्भाव करण्यात आला. दरवर्षी प्रमाणे सॉफ्टस्किल संदर्भात मार्गदर्शन व मूल्यमापन केले. एम.एड (शा.शि.) अभ्यासक्रमासाठी आऊट डोअर एज्युकेशन या विषयाचे प्रत्यक्ष अनुभव गरूड माची, मुळशी येथे देण्यात आले यासाठी डॉ. उज्वला राजे यांनी मार्गदर्शन केले.

- **यूजीसी (एमआरपी), स्पोर्टस व कॉलेज डेव्हलपमेंट प्लॅन डॉक्युमेंटस सबमिशन**

युजीसी च्या ११ व्या प्लॅन अंतर्गत क्रीडासाहित्य (अनुदान रु. ४ लाख) व महाविद्यालय विकासासाठी (अनुदान रु. ९ लाख) प्राप्त अनुदानाबाबतचे अंतिम सबमिशन करण्यात आले. या व्यतिरिक्त १० प्राध्यापकांनी एमाआरपी सबमिशन केले.(डॉ नयना निमकर,डॉ.माधुरी वाघचौरे, डॉ. के.आर. पाटेकर,डॉ. बालाजी पोटे, डॉ. शरद आहेर, डॉ. उज्वला राजे, डॉ. श्रध्दा नाईक,डॉ. एस.एस.महाडिक, डॉ.महेश देशपांडे, डॉ. योगेश बोडके) यामध्ये प्राध्यापकांनी एकूण रु ३,०२,०००/– ची पुस्तके ग्रंथालयात जमा केली व रु. ३,१०,०००/–चे क्रीडासाहित्य व लॅब इक्विपमेंट महाविद्यालयामध्ये जमा केली.

- **पारितोषिके**

महाराष्ट्रीय मंडळातर्फे खालील विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

कु. नकिता फर्नांडिस –बी.एड्.(शारीरिक शिक्षण) महाविद्यालयात सर्वप्रथम

कु. जलजा शिरोळे – एम.एड्.(शारीरिक शिक्षण) महाविद्यालयात सर्वप्रथम

राज्य, राष्ट्रीय/खुल्या स्पर्धेत चमकलेल्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

- **विद्यार्थी उपक्रम**

**कँपस प्लेसमेंट**

विद्यार्थ्यांना नोक–या मिळण्याच्या दृष्टीने महाविद्यालयात कँपस इंटरव्हयू आयोजित केले जातात. एम.एड्.(शा.शि.) अभ्यासक्रमाच्या ४० विद्यार्थ्यांसाठी कँपस इंटरव्हयू आयोजित करण्यात आले.

विविध नामांकित शाळा, फिटनेस जिम, क्रीडामार्गदर्शक, शारीरिक शिक्षण संचालक आमच्या बी.एड्.(शा. शि.) व एम. एड्.(शा.शि.) च्या विद्यार्थ्यांना नोक–या मिळतात. वर्षभरात विद्यार्थ्यांना नोकरी संदर्भात सहकार्य करण्यात येते.

- **विशेष प्रयोग**

प्रत्येक विषयाच्या विविध घटकांवरील युनिट टेस्ट व क्लास टेस्टद्वारे विद्यार्थ्यांचे आकारीक मूल्यमापन करण्यांत आले. विविध खेळ व क्रीडाबाबींचे साहित्य, तात्विक बाबी व नियम यांचे आकलनासाठी विशेष प्रदर्शनाचे आयोजन करण्यांत आले.

### शैक्षणिक वर्ष २०१५–१६ साठी बी.पी.एड्.व एम. पी.एड्. पदवीचे नियुक्त विद्यार्थी मंडळ

| Sr. No. | Designation | Name |
|---|---|---|
| 1 | Offg. Principal – Chairman | Dr. M. T. Waghchoure |
| 2 | Lecturer nominated by Principal | Dr. U. L. Raje |
| 3 | National Service Scheme Prog. Officer | Dr. A. F. Shinde |
| 4 | Director of Sports & Phy.Edn. | Mr. S.V. More |
| 5 | Highest Academic Merit preceding year for B.Ed.(Phy.Edu) | Ms. Shinde Rupali |
| 6 | Highest Academic Merit preceding year for M.Ed.(Phy.Edu) I$^{st}$ Year | Ms. Argade Pratibha |
| 7 | Highest Academic Merit preceding year for M.Ed.(Phy.Edu) II$^{nd}$ Year | Mr. Gaikwad Ketan (M.Ed.IInd Yr) |
| 8 | Nominated by Principal Outstanding Sport Performance (U.R.) | Mr. Zia-Ul- Rehman Pathana (B.P.Ed.Ist Yr) |
| 9 | Student member - N.S.S. Scheme | Ms. Gadhave Sanjivani |
| 10 | Student member - N.C.C. Scheme | Mr. Vipin |
| 11 | Student member - Cultural Activity | Ms. Gaikwad Deepali |
| 12 | Lady student representative | Ms. Naik Ketki (M.P.Ed.Ist Yr) |
| 13 | Lady student representative | Ms. Kadam Swati B.P.Ed. (Ist Yr) |

- **सांस्कृतिक कार्यक्रम व व्याख्याने**

वर्षभरातील विविध सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबरच प्रेरणादिन,देशभक्तिपर गीते, राष्ट्रीय सण इत्यादिं कार्यक्रमांचा समावेश होता. विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित करण्यात आली.

1) डॉ. अतुल गायकवाड –कोचिंग (16-2-2016)

2) डॉ. मोहन आमृळे procedure of equipment purchase, maintenance & stock checking (17/2/16)

3) कर्नल पेंडसे – Benefits of Accupressure (18-2-2016)

4) डॉ. प.म.आलेगांवकर - Sports Psychology (19-2-2016)

5) दि.१९ फेब्रुवारी २०१६ रोजी शिवजयंती च्या निमित्ताने शिवचरित्रावर विद्यार्थ्यांची व्याखाने पोवाडे असे कार्यक्रम आयोजित करण्यांत आले.

6) प्लॅस्टिकमुक्त भारत अभियान, मातृभाषादिन, संविधान दिन साजरे करण्यात आले

- **परीक्षा आयोजन व केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने एम.एड्. (शा.शि.) ची परीक्षा. बी.पी.एड् व एम.पी.एड्. अभ्यासक्रमाच्या केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प महाविद्यालयाकडे सोपविण्यांत आला. केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाचे कार्य डायरेक्टर डॉ. माधुरी वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले.

- **तंत्रज्ञानाधिष्ठित अध्यापन, संशोधन व व्यवस्थापन**

काळानुरूप आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून अध्यापन व संशोधन करण्यासाठी Smart Board चा वापर होतो.

सध्याच्या काळात ई–बुक्स, ई जर्नल्सचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असून ग्रंथालयात टॅब्जचा उपयोग प्रभावीपणे होतो

Human performance Lab मध्येही बायसिकल एरगोमीटर, लॅक्टेट ॲनलायझर, स्कोलोसिस मीटर अशा अत्याधुनिक साधनांद्वारे शास्त्रीय संशोधने हाती घेण्याची योजना आहे.

सर्व सुविधांनी युक्त संगणक कक्षामध्ये SPSS 21.0 हे संख्याशास्त्राचे Software असून एम.एड्. (शा.शि.) ते पीएच.डी.पर्यंत विद्यार्थ्यांना वापरासाठी प्रशिक्षित केले जाते. प्रशासकीय कार्य सुकर होण्यासाठी त्यात हजेरीच्या नोंदी चोख होण्यासाठी Attendance software विकसित करून त्याचा ट्राय आऊट घेऊन या सॉफ्टवेअर वापरले जाते.

- **ग्रंथालय**

या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयामध्ये रू.८३९०८/– ची ग्रंथखरेदी करण्यात आली.ग्रंथालयात विद्यार्थ्यांसाठी 08 संगणक व वाय फाय सुविधा उपलब्ध आहे. या वर्षाअखेर ग्रंथालयामध्ये एकूण पुस्तके 18042, टायटल्स 13408, सीडीज 82 व व्ही.सी.डी 100 इ. उपलब्ध आहेत.

- **निवृत्ती व नियुक्ती**

महाविद्यालयाचे मुख्य लिपिक श्री जयंत तपस्वी दि. ३० एप्रिल २०१५ रोजी सेवानिवृत्त झाले.त्यांचे जागी सौ. नेत्रा उदगीर यांना सेवज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात आली. महाविद्यालयातील चतुर्थश्रेणी कर्मचारी श्री.सुरेश उबाळे दि.३० सप्टेंबर २०१५ रोजी सेवानिवृत्त झाले.तर ग्राउंडमन श्री विठ्ठल सुतार दि.३१ मे २०१६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत.

महाराष्ट्रीय मंडळाचे सरचिटणीस, श्री धनंजय दामले यांचे प्रोत्साहन आणि आमचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे महाविद्यालय प्रगतीपथावर आहे.

**(डॉ. माधुरी वाघचौरे)**
**प्रभारी प्राचार्य**

**21/04/2016**